# निगडी पोलीस ठाणे तपास पथक कामगिरी

# पिस्टलचा धाक दाखवुन लुटमार करणारे तीन सराईत गुन्हेगार जेरबंद, ०१ पिस्टल,०२ कोयते व १,३५,४००/- रु चा मुद्देमाल जप्त

सदर प्रकरणाची हकीकत अशी की, यातील फिर्यादी हे हडपसर भागात राहत असून ते एका पिकअप गाडीवर चालक आहेत. दि.२१/०५/२०२४ रोजी रात्री ते व त्याचा मित्र असे त्याचेकडील पिकअप गाडीमध्ये हडपसर येथून तळेगाव दाभाडे येथे माल सोडण्यासाठी जात असताना पुणे मुंबई जुना हायवे खंडोबा माळ चौकासमोर गाडीचे टायर गरम झाल्याचे कारणावरुन रस्त्याचे कडेला थांबले असताना पहाटे ०५.०० वा.सुमारास एक निळ्या रंगाचे बुलेट मोटार सायकलवर आलेल्या अनोळखी तीन इसमांनी त्याठिकाणी येवून त्यांना ते पोलीस आहेत असे सांगून त्यांना पिस्टल व कोयताचा धाक दाखवून त्यांचेकडून ७०००/- रु लुटमार करून नेल्याने निगडी पोलीस ठाणेस **गु.र.नं. २६६/२०२४ भा.दं.वि.सं.कलम ३९२,५०६,३४ आर्म अँक्ट ३(२५),४(२५), प्रमाणे दि.२३/०५/२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.**

सदर गुन्हा दाखल झाल्यावर आम्ही वरिष्ठ पोलीस निरीक्षक निगडी यांना तात्काळ यातील आरोपीचा शोध घेवून आरोपी अटक करणेबाबत आदेशीत केले. त्यानुसार निगडी पोली ठाणे येथील तपास पथाकाच्या दोन टिम तयार करुन गुन्ह्यातील अनोळखी आरोपींचा शोध सुरु केला. सदर पथकाने परिसरातील सी.सी.टी.व्ही.फुटजे तपासाला सुरुवात करून आरोपींचा मार्ग काढत २५० ते ३०० सी.सी.टी.व्ही फुटेज तपासून आरोपी हे गुन्हा केल्यानंतर खेड शिवापुर पुणे परीसरात गेले असल्याचे निष्पन्न करून त्याप्रमाणे खेडशिवापूर येथील एका लॉंज बाहेरुन तपास पथकानी सापळा लावून आरोपी १) आकाश मनोज लोट वय-२२ वर्षे रा.फ्लॅट नं.११११, ३-विंग, ऐश्वर्याम हमारा सोसायटी, मोशी पुणे २) सनी ऊर्फ अशुतोष अशोक परदेशी ऊर्फ रोकडे वय-३२ वर्षे रा.रुम नं.२४, बिल्डींग नं.एस,मिलींद नगर, पिंपरी पुणे. ३) अनिकेत गौतम शिंदे वय-२४ वर्षे रा.अजय बिराजदार यांच्याकडे भाड्याने, पाटीलनगर, चिखली पुणे यांना ताब्यात घेवून त्यांचेकडून **०१ लोखंडी पिस्टल, ०२ मोबाईल फोन, ०२ लोखंडी कोयते व गुन्हयात वापरलेली ०१ बुलेट मोटार** सायकल असा एकूण १,३५,४००/- रु चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदर तीन आरोपी हे रेकॉर्डवरील गुन्हेगार असून यातील आरोपी क्र. १ यांचेवर ०२, आरोपी क्र. २ याचेवर ०७ , आरोपी क्र.०३ याचेवर ०२ गुन्हे दाखल आहे. तसेच आरोपी क्र. २ हा पिंपरी पोलीस ठाणे येथे पाहीजे आरोपी आहे.

सदरची कामगिरी मा.श्री.विनयकुमार चौबे पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड,मा.श्री.वसंत परदेशी अप्पर पोलीस आयुक्त सो ,मा. स्वप्ना गोरे पोलीस उप-आयुक्त सो परि-१, मा.राजु मोरे सहा.पोलीस आयुक्त सो, चिंचवड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली निगडी पोलीस स्टेशन कडील श्री.शत्रुघ्न माळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक,मा.तेजस्वीनी कदम पोलीस निरीक्षक (गुन्हे) ,सहा पोलीस निरीक्षक,श्री.अंबरिष देशमुख पोहवा/ दत्ता शिंदे,सुधाकर आवताडे,राहुल गायकवाड,विनोद व्होनमाने,भुपेंद्र चौधरी, सिद्राम बाब, तुषार गेंगजे,प्रविण बांबळे,विनायक मराठे, सुनिल पवार, केशव चेपटे, तसेच सी.सी.टी.व्ही.कंट्रोल रुम येथील मपोशी स्वप्नाली म्हसकर,सारीका अंकुश यांनी केली आहे.

(स्वप्ना गोरे)<br>
पोलीस उप-आयुक्त<br>
परि -१ पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय